# श्री सोमवंशीय सहस्त्रार्जुन क्षत्रिय समाज (ट्रस्ट) पुणे

प्रमुख कार्यालय : ५७६, गुरुवार पेठ, पुणे ४२. फोन : २४४७२३४०, २४४३५६१५
उपकार्यालय : ४९७, ४९८, ५००, घोरपडे पेठ, पुणे - ४११ ०४२. (रजि. नं. ए-१६)



## वार्षिक अहवाल : सन २००४-०५

# कार्यकारिणी व विश्वस्त मंडळ पदाधिकारी



अध्यक्ष
श्री. गजानन अर्जुनसा शालगर



उपाध्यक्ष
श्री. अशोक लक्ष्मणसा रंगापुरे



सचिव
श्री. संदीप मोतीलालसा चव्हाण डी.सी.ई.



उपसचिव
श्री. राजेंद्र महादेवसा बद्दी



खजिनदार
श्री. राजेंद्र मनोहरसा झाड



हिशेब तपासनीस
श्री. राजेंद्र चव्हाण

## कार्यकारिणी सदस्य



श्री. राजा भगवानसा पवार बी.ई.



श्री. मोतीलाल सिद्रामसा कोल्हापुरे



श्री. श्रीकांत कृष्णातसा कटारे



श्री. अनिल चंदुलालसा पवार



श्री. राजेंद्र दत्तुसा हबीब
(९/९/०५ पर्यंत)



सौ. स्नेहलता अरुणसा पवार
(९/९/०५ पासून)

तव स्मरण सतत आम्हा स्फुर्तीदायी राहो !



पुण्यासह संपूर्ण महाराष्ट्राला अभिमान वाटावा असे कार्यक्षम अध्यक्ष

कै. डॉ. प्रकाश भुजंगसा त्रिमल

यांना पुणे ग्रामसभेच्यावतीने भावपूर्ण श्रद्धांजली !



भगवान श्री विष्णुमूर्ती प्राणप्रतिष्ठापना प्रसंगी डावीकडून सर्वश्री प्रभाकरसा बाकळे, श्रीकांत कटारे, अध्यक्ष गजाननसा शालगर, राजेंद्र बद्दी, मोतीलाल कोल्हापुरे, राजेंद्र झाड, मोहनसा पवार.



भगवान श्री विष्णू मूर्ती व श्री पंचमुखीमारुती मूर्ती प्राणप्रतिष्ठापना प्रसंगी होमहवन विधी करताना सौ. व श्री. प्रभाकरसा बाकळे तसेच सौ. व श्री. राजेंद्र बद्दी







शासकीय सेवेतील उच्चपदस्थांचा सत्कार करताना मान्यवर





सभेच्या अध्यक्षपदावरुन बोलताना नाशिक येथील 'सहस्रार्जुन जागृतीचे' संपादक मा. विलास कट्यारे

**श्री सोमवंशीय सहस्रार्जुन क्षत्रिय समाज (ट्रस्ट), पुणे**

कार्यालय - ५७६, गुरुवार पेठ, पुणे ४११ ०४२.

दूरध्वनी : २४४७२३४०, २४४३५६९५

( कार्यालयीन वेळ : सायं ४ ते ७ )

# -० वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस ०-

(फक्त सभासदांसाठी)

माननीय समाज बंधु-भगिनींनो,

आपल्या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा **सोमवार** दिनांक **२८ नोव्हेंबर २००५** रोजी **टिळक स्मारक मंदीर सभागृह,** एस. पी. कॉलेजशेजारी, टिळक रस्ता, पुणे ३० येथे सायं. ठीक ४.०० वा. होणार आहे. समाजाच्या सर्व सभासद बंधु-भगिनींनी या सर्वसाधारण सभेला वेळेवर उपस्थित रहावे, ही नम्र विनंती.

## -० सभेपुढील विषय ०-

१. दिनांक ६ सप्टेंबर २००४ व दिनांक २९ नोव्हेंबर २००४ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचून कायम करणे.

२. सन २००४ ते २००५ चा ताळेबंद व हिशेब संमत करणे.

३. स्वारगेट प्रकल्पाबाबत.

४. ऑडीटरची नेमणूक.

५. समाजबांधवांचे ठराव व सूचना यावर चर्चा.

६. अध्यक्षांच्या परवानगीने चर्चेस येणारे आयत्या वेळचे विषय.

सचिव

**संदीप मोतीलालसा चव्हाण**

डी.सी.ई.

पुणे

दिनांक : ८/११/२००५

## ✿ सभासदांना सूचना ✿

१. गणसंखेअभावी सभा न घेता आल्यास ती सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्यातासानंतर घेण्यात येईल व या सभेस गणसंख्यापूर्तीचे बंधन रहाणार नाही.

२. अहवालातील वृत्तांसंबंधी व ताळेबंद जमाखर्चाबद्दल कोणा सभासदास काही कागदपत्रे पहावयाची असतील त्यांनी दिनांक २३/११/२००५ व २४/११/२००५ रोजी सायं. ४ ते ७ या वेळांत लेखी अर्जासह संस्थेच्या कार्यालयात उपस्थित रहावे.

३. सभेस येताना अहवालाची आपली प्रत सोबत आणावी.

४. सभास्थळी प्रत्येक सभासदाने आपले नांव लिहून सही करणे आवश्यक आहे.

५. सर्वसाधारण सभेत कोणा सभासदास काही सूचना अगर ठराव मांडावयाचा असल्यास तशा सूचनेसह अगर ठरावासह लेखी अर्ज संस्थेच्या मुख्य कार्यालयात दिनांक २४/११/२००५ पर्यंत सायं. ४ ते ७ या वेळेत आणून देऊन त्या प्रतीवर पोहोच घेणे आवश्यक आहे. फक्त संस्थेच्या कार्यासंबंधीच्या सूचनांचा/ठरावांचा यात विचार केला जाईल. कार्यकारिणीच्या परवानगीने ही सूचना/ठराव सर्वसाधारण सभेत मांडली जाईल. कोणत्याही वैयक्तिक तक्रारींचा वा ठरावांचा यात विचार केला जाणार नाही.

६. फक्त संस्थेच्या सभासदांनाच या सभेत भाग घेता येईल. प्रत्येक इच्छुक सभासदास आपले विचार मांडता येतील याची कृपया नोंद घ्यावी.

७. कृपया या सभेस लहान मुलांना आणू नये. त्याने सभेच्या कार्यात अडथळे येतात.

८. समाजहिताशी संबंधीत असेच प्रश्न मांडून त्यावर आटोपशीर चर्चा करावी. विषय अथवा विचारांची पुनरावृत्ती टाळून आम्हाला सहकार्य करावे, जेणेकरून सभेचा वेळ वाया न जाता जास्तीत जास्त सभासदांना आपले विचार व्यक्त करण्याची संधी मिळेल.

❑❑❑

**टीप :-** समाजबांधवांना वार्षिक अहवाल पोस्टाने पाठविण्यात येतील. ज्यांना अहवाल मिळणार नाहीत त्यांना दिनांक १८ नोव्हेंबर नंतर कार्यालयात अहवाल उपलब्ध होतील.

## ✿ अध्यक्षीय मनोगत ✿

सन्माननीय समाजबंधु भगिनिंनो,

श्री सो. स. क्षत्रिय समाज (ट्रस्ट) पुणे, या संस्थेचा २००४-२००५ चा अहवाल आपणापुढे सादर करीत आहे.

दरवर्षीप्रमाणे ट्रस्ट मार्फत १५ ऑगस्ट, २६ जानेवारी हे राष्ट्र ध्वजारोहणाचे कार्यक्रम तसेच श्री सुभाननाथ महाराज जयंती, कोजागिरी, नवरात्र, श्री सहस्रार्जुन जयंती इ. कार्यकम तसेच शिक्षण मंडळामार्फतहोणारे मोफत पुस्तके-वह्या-गणवेष वाटप, पारितोषिक वितरण उपक्रम आणि महिला मंडळामार्फत हळदी-कुंकु व तिळगुळ समारंभ, नागपंचमी, गोकूळ अष्टमी इ. उपक्रम व युवक संघटनेमार्फत गणेशोत्सव, स्पर्धा सप्ताह हे उपक्रम यशस्वी रित्या पार पडले आहेत.

तसेच जवळ जवळ १५ निराधार समाज बंधु-भगिनी मोफत धान्य व वस्त्र वाटप योजनेचा लाभ घेत आहेत.

दैनंदिन कामकाजाबरोबरच भू-भाडेकरुंच्या केसेस चालविण्याची जबाबदारीही कार्यकारिणी पार पाडत आहे. चारही केसेसचे निकाल ट्रस्टचे बाजूने लागले आहेत. यापैकी भारत पेट्रोलियम या भू-भाडेकरुने एप्रिल २००६ अखेर जागेचा ताबा देण्याचे कोर्टापुढे मान्य केलेले आहे. तसेच कादीरभाई यांचे अपिलाचा निकाल ट्रस्टचे बाजूने लागला असून ट्रस्टने हायकोर्टात या केसबाबत कॅव्हेट दाखल केले आहे. हेमाडे ह्या भू-भाडेकरुचे अपिला दरम्यान निधन झाल्याने सदर अपिल पुढे ढकलले गेले आहे. ग्रामीण पोस्ट ऑफिसची जागाही ताब्यात मिळणेसाठी दावा दाखल करण्याची तयारी झाली असून लवकरच दावा दाखल होईल.

१५ ऑगस्ट २००५ रोजी युवक संघटनेची पुनर्स्थापना करण्यात आली. युवक संघटनेच्या कार्यकर्त्यांनी मोठ्या उत्साहाने कार्यास सुरुवात केली आहे. गणेशोत्सव व स्पर्धा सप्ताह त्यांनी अत्यंत यशस्वीरीत्या पार पाडले, त्याबद्दल युवक संघटनेच्या सर्व कार्यकर्त्यांचे मी अभिनंदन करतो.

महिला मंडळानेही ट्रस्टच्या सर्व उपक्रमात भाग घेऊन उपक्रम यशस्वी करण्यात सिंहाचा वाटा उचललेला आहे. त्यांचेही मन:पूर्वक अभिनंदन !

या वर्षीच्या श्री सहस्रार्जुन जयंती पासून इतर काही शहरात अनेक वर्षे चालू असलेली प्रथा सुरु केली आहे ती म्हणजे श्री सहस्रार्जुन महाराजांचा आशीर्वादरुपी हाराची बोली करुन सर्वात जास्त बोली बोलणाऱ्या समाजबांधवाचे हस्ते जयंतीचे दिवशी आरती करणे. या वर्षी ध्यानी-मनी नसताना श्री सहस्रार्जुन महाराजांचा आशीर्वाद रुपी हार घेण्याचे भाग्य मला लाभले आहे.

ट्रस्ट कार्यकारिणीमध्ये गेली १३ वर्षे सतत कार्यरत असलेले कार्यकारिणी सदस्य **श्री. राजेंद्र दत्तुसा हबीब** यांनी त्यांच्या वैयक्तिक कार्यव्याप्तीमुळे ट्रस्ट कार्यकारिणीचा राजीनामा दिला. ते वनाज कंपनीत कामगार युनियनचे अध्यक्ष असल्याने त्यांना तेथे पूर्ण वेळ लक्ष द्यावे लागते. त्यामुळे समाजाच्या कार्यात पुरेसा वेळ देता येत नसल्याने नविन व्यक्तिस संधी देण्याच्या उद्देशाने त्यांनी कार्यकारिणी सदस्यत्वाचा विनम्रतेने राजीनामा दिला. कार्यकारिणीस तो नाईलाजास्तव स्विकारावा लागला.

समाजातील महिलांना प्रतिनिधीत्व देण्याच्या उद्देशाने कार्यकारिणीने त्यांच्या जागी **सौ. स्नेहलता अरुणसा पवार** यांची दि. ९/९/०५ रोजी झालेल्या कार्यकारिणीच्या बैठकीत एकमताने निवड करण्यात आली. त्यांना सामाजिक कार्याची आवड असून राजकीय क्षेत्रातही त्यांनी चांगले कार्य केले आहे. त्यांच्या राजकीय कार्याचा समाजासही उपयोग होईल, असा विश्वास वाटतो.

मला नमूद करण्यास आनंद वाटतो की आपल्या ट्रस्टने काळाची गरज असलेले **'वधु-वर मेळावा'** व **'मौंजीबंधन'** हे दोन सामाजिक उपक्रम जानेवारी २००६ मध्ये घेण्याचे ठरविले आहे. या उपक्रमास भरघोस पाठींबा मिळणार यात तिळमात्र शंका नाही. आपल्या घरचेच कार्य समजून सर्व समाज बंधु-भगिनींनी या उपक्रमास तन-मन-धन अर्पण करावे, ही नम्र विनंती.

आपल्या समाजाचे धडाडीचे माजी अध्यक्ष **डॉ. प्रकाश त्रिमल** हे आपल्याला २७ एप्रिल २००५ रोजी सोडून गेले आहेत. आपल्या समाजाचे कधीही न भरुन येणारे नुकसान झाले आहे. त्यांच्या दूरदृष्टीचा, धडाडीचा समाजाला अतोनात फायदा होणार आहे. खंबीर नेतृत्व - कार्यकर्त्यांचा कामात उत्साह वाढविण्याची हातोटी - कुठल्याही प्रसंगाला सामोरे जाण्याची तयारी, प्रत्येक कामाचे अभ्यासपूर्वक नियोजन इ. गुणांमुळे ते आपल्या सर्वांच्या कायम स्मरणात रहाणार आहेत.

या सर्वसाधारण सभेत मांडावयाच्या ठरावांची माहिती, मागील वर्षाचा ताळेबंद व जमाखर्च तसेच उपसंस्थांच्या कार्याचा आढावा, काही निवेदने, आवाहने या अहवालात दिलेली आहेत. या सर्वांचा आपण नीट अभ्यास करुन चर्चेत भाग घ्यावा, आपली मते व योग्य त्या सूचना मांडाव्यात.

आम्ही आमच्या परीने ट्रस्टचा कारभार योग्य तऱ्हेने चालविण्याचा प्रयत्न करीत आहोत, हे करताना काही कठोर निर्णय घ्यावे लागतात, काही मतभेद निर्माण होतात, आमचे हातूनही काही चूका नकळत होत असतील, या सर्वांतून सुवर्णमध्य काढीत सर्वांना बरोबर घेऊन आम्हाला हे समाजकार्य चालू ठेवावयाचे आहे.

ही कार्यकारिणी आपली कर्तव्ये प्रामाणिकपणे व पूर्ण पारदर्शकता बाळगून पार पाडीत राहील असा विश्वास कार्यकरिणीच्या वतीने मी आपणापुढे व्यक्त करतो.

धन्यवाद !

**गजानन अर्जुनसा शालगर**
अध्यक्ष

## ✿ सर्वसाधारण सभेपुढील ठराव व विषय ✿

• **विषय क्र. १** : या आधीची सर्वसाधारण सभा दि. ६ सप्टेंबर २००४ व २९ नोव्हेंबर २००४ रोजी झाली. सदरील सभेचा वृत्तांत सभेच्या दिवशी सभागृहात वाचण्यात येईल. तो वृतांत कायम करणेबाबत.

• **विषय क्र. २** : सन २००४ - सन २००५ चा ताळेबंद व हिशोब संमत करणे. अहवालात सन २००४ - २००५ चा संपूर्ण ताळेबंद व हिशोब तपशीलवार दिलेला आहे. ताळेबंद व हिशोब सभासदांना पहाण्यासाठी संस्थेच्या कार्यालयात दोन दिवस ठेवण्यात आले आहेत. याबद्दल सभासदांच्या शंकांचे निरसन कार्यालयातच, कार्यालयीन वेळेत करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

• **विषय क्र. ३** : स्वारगेट प्रकल्पाबाबत :-

सर्व समाजबांधवांस कल्पना आहेच की आपल्या पुणे ग्रामसभेतील समाजबांधवांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. पुणे हे शैक्षणिक व व्यापारी शहर असल्याने परगावाहून पुण्यात येऊन स्थायिक होणाऱ्या समाजबांधवांची संख्या मोठी आहे. यासर्व समाजबांधवांना पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. स्वारगेट येथे सुदैवाने आपल्या समाजाची मोठी जागा उपलब्ध आहे. तेथील ४ भूभाडेकरुंच्या ताब्यात असलेली जागा ट्रस्टच्या ताब्यात मिळावी यासाठी कोर्टात दाखल केलेल्या दाव्यांचे निकाल ट्रस्टच्या बाजूने लागत आहेत.

स्वारगेट प्रकल्पामध्ये सुसज्ज मंगल कार्यालय, व्यायाम शाळा, विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह, ट्रस्ट व सर्व उपसंस्थांची कार्यालये, नवीन एकत्रित भव्य मंदीर व सांस्कृतिक हॉल अशी योजना आहे. प्रकल्पाच्या कामाचा व्याप मोठा असल्याने त्यासाठी एक ट्रस्टच्या अंतर्गत बांधकाम समिती व त्या अंतर्गत इतर उपसमित्या उदा. निधी उभारणी समिती, म.न.पा. नकाशा मंजुरी समिती इ. स्थापन कराव्या लागतील. त्याचप्रमाणे नकाशामंजुरीसाठी म.न.पा.स भरावे लागणाऱ्या टॅक्सची रक्कम ही आम्हांस असलेल्या रु. ५०,०००/- च्या अधिकारापेक्षा मोठी असू शकते. तरी यासंबंधी सर्व समित्या नेमणे व नकाशा मंजूरी व इतर अनुषंगिक कामे जी स्वारगेट प्रकल्पासाठी करणे आवश्यक आहेत ती करण्याचा व तिच्या खर्चासाठी समाजबांधवांनी ट्रस्टला आवश्यक ते अधिकार मंजूर करावेत.

• **विषय क्र. ४** : ऑडिटरची नेमणूक करणे.

• **विषय क्र. ५** : समाज बांधवांचे ठराव व सूचना यावर चर्चा.

• **विषय क्र. ६** : अध्यक्षांच्या परवानगीने चर्चेस येणारे आयत्या वेळचे विषय.

## ✿ कार्याचा आढावा ✿

**कोर्ट प्रकरणे :**

गेल्या वर्षभरात कोर्ट प्रकरणात ट्रस्टची बरीच प्रगती झाली आहे. भू-भाडे करु श्री. हेमाडे व श्री. कादीरभाई यांनी ट्रस्टच्या बाजूने लागलेल्या निकाला विरुद्ध अपिल दाखल केली आहेत. त्यापैकी श्री. कादीरभाईच्या अपिलाचे कामकाज पूर्ण होऊन त्याचा निकाल ट्रस्टचे बाजूने लागला आहे. सदर कादीरभाई या निर्णया विरुद्ध हाय कोर्टात अपिल करण्याची शक्यता असल्याने ट्रस्टच्यावतीने हायकोर्टात कॅव्हेट दाखल करण्यात आले होते. नुकतेच कादीरभाईचे अपिल हायकोर्टात सादर केले असून लवकरच त्यावर आर्ग्युमेंट होण्याची शक्यता आहे. हे अपिल हायकोर्टात फेटाळले जाईल असा आम्हाला विश्वास वाटतो.

दूसरे भू-भाडेकरु श्री. हेमाडे यांचे अपिल दरम्यान निधन झाल्याने सदर अपिल सध्या चालू आहे. तसेच ग्रामीण पोस्ट ऑफिसकडे सहस्रार्जुन भवन बिल्डींगचा पूर्ण पहिला मजला आहे. त्याचे भाडे उत्पन्न अल्प आहे. सदर जागा ताब्यात मिळणे करीता ट्रस्टचे वतीने कायदेशीर कारवाई सुरु केलेली आहे. त्यांना पहिली नोटीस दिली असून लवकरच कोर्टात दावा दाखल करण्यात येणार आहे.

कोर्ट कामकाजात ॲड. विजय महादेव बद्री व ॲडव्होकेट श्री.एस.पी.देव यांचे मोलाचे सहकार्य लाभत आहे.

**निराधार सहाय्य योजना :**

समाजातील निराधार समाज बंधू-भगिनींसाठी ट्रस्ट निराधार सहाय्य योजना राबवीत असून यात निराधारांना दरमहा धान्य वाटप - रोख रक्कम व दर ३ महिन्यांनी वस्त्र याचे वाटप केले जाते. या अहवाल वर्षात १६ जणांनी याचा लाभ घेतला आहे. ही योजना राबविण्यासाठी सधन समाज बांधवांनी ट्रस्टला आर्थिक सहाय्य करावे, अशी कार्यकारीणीच्या वतीने विनंती आहे. या कार्यासाठी दरवर्षी सुमारे रु. ५०,०००/- ची आर्थिक तरतूद करण्यात आली आहे.

**वैद्यकीय सहाय्य योजना :**

या योजने अंतर्गत ज्या गरीब समाजबांधवांना त्यांच्या मोठ्या आजरपणात खर्च करण्याची क्षमता कमी पडते त्यांना आर्थिक मदत दिली जाते. यावर्षी ६ जणांनी याचा लाभ घेतला. या कार्यासाठी दरवर्षी सुमारे रु. २५,०००/- ची आर्थिक तरतूद करण्यात आली आहे.

**समाज बांधवांना दु:खद प्रसंगी मोफत कार्यालय :**

दशक्रिया विधी सारख्या दु:खाच्या कार्यासाठी 'क्षत्रिय भवन' (गुरुवार पेठ) कार्यालय मोफत उपलब्ध केले जाते. फक्त साफ-सफाईचे रु.१००/- (रु. शंभर) घेतले जातात.

**शासकीय सेवेतील समाज बांधव परिचय मेळावा :**

पुण्यात आपल्या समाजाची सुमारे १००० घरे असून बाहेर गावचे कुटुंबही येथे स्थायिक होत आहेत. एवढा मोठा समाज असून आपल्या समाजातील अनेक बंधु-भगिनी शासकीय सेवेत मोठ्या हुद्यावर आहेत.

त्यांचा इतर समाज बंधु-भगिनींना उपयोग व्हावा व त्या सर्वांचा समाजास परिचय व्हावा या हेतूने सदर मेळावा कार्यकारिणीने ३ सप्टेंबर रोजी आयोजित केला होता.

या पहील्या प्रयत्नात पुढील शासकीय सेवकांचा परिचय करुन देण्यात आला.

| | |
|---|---|
| **श्री. उल्हास भुजंगसा त्रिमल** | (इन्कमटॅक्स कमिशनर, सोलापूर जिल्हा) |
| **श्री. डी. के. चव्हाण** | (प्रो. एम.आय.टी. कॉलेज) |
| **कु. दमयंती पंडीतसा पवार** | (पीसीएमसी) |
| **श्री. अंबादास चव्हाण** | (डीवायसीई, पीसीएमसी) |
| **श्री. दिनेश मोतीलाल चव्हाण** | (एक्साईज डिपार्टमेंट, पुणे.) |
| **श्री. सुनिल दिगंबरसा फुलपगार** | (एक्साईज डिपार्टमेंट, मुंबई) |
| **श्री. राकेश शरद हबीब** | (पुणे मनपा जन्ममृत्यू नोंदणी कार्यालय) |
| **श्री. राजेंद्रकुमार हिरालाल आरसिद्ध** | (सेल्सटॅक्स डिपार्टमेंट, मुंबई) |
| **श्री. प्रविण रामचंद्रसा दामजी** | (खडकी कॅन्टोंमेंट पुणे) |
| **श्री. हेमंत दौलतराम चव्हाण** | (कमिशनर ऑफीस, पुणे) |
| **श्री. दिपक पवार** | (ॲम्युनिशन फॅक्टरी,पुणे) |
| **सौ. सीमा प्रद्युम्न येवलेकर(चिनगी)** | (बँक ऑफिसर) |
| **सौ. राजश्री सुनिल पवार** | (एम.एस.ई.बी.) |

सदर परिचय मेळाव्याचे अध्यक्ष स्थानी **श्री. विलास कट्यारे**,संपादक सहस्रार्जुन जागृती हे होते.तसेच समाजातील उद्योगपती **श्री. रत्नाकर हिरालालसा झाड** व **श्री. स्नेहकांत नरसिंगसा बद्दी**, संचालक सहस्रार्जुन ना.सह. पतसंस्था व जेष्ठ समाजबांधव **श्री. हिरालालसा आरसिद्ध** व **श्री. उल्हास त्रिमल** हे व्यासपीठावर हजर होते.

## युवक संघटनेची पुनर्स्थापना :

या वर्षी १५ ऑगस्ट २००५ रोजी युवक मेळावा घेण्यात आला. आजी-माजी युवकांनी त्यात भाग घेतला होता. युवक संघटनेचे कार्य गेली २-३ वर्ष ठप्प झाले होते. त्याबाबत सर्वांनी चिंता व्यक्त केली व युवक संघटनेची गरज असल्याने त्वरीत युवक संघटनेची पुनर्स्थापना व्हावी अशी भावना सर्वांनी व्यक्त केली. त्यास उत्तम प्रतिसाद युवकांकडून मिळाला व त्याच बैठकीत युवक संघटनेची पुनर्स्थापना करण्यात आली.

सदर मेळाव्यात श्री. दत्तात्रय कठारे, श्री. प्रविण दामजी, श्री. सुर्यकांत हबीब, श्री. गोपाळ चव्हाण, श्री. नितीन चावंडे, श्री. हेमंत खेरुड, श्री. शाम रंगापुरे, श्री. यल्लेश रंगापुरे, श्री. गणेश हौजी, श्री. गोपाळ आरसिद्ध आदींनी युवकांना मार्गदर्शन केले. युवक संघटनेच्या माजी पदाधिकाऱ्यांचा सत्कारही करण्यात आला.

सदर बैठकीनंतर युवक संघटनेची वेगळी बैठक होऊन त्यात श्री. संजय चव्हाण यांची अध्यक्षपदी व श्री. मनिष कोल्हापुरे यांची उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. युवक संघटनेचे कार्य जोमाने सुरु झाले असून त्यांनी गणेशोत्सव व श्री सहस्रार्जुन जयंती निमित्त स्पर्धा सप्ताहाचे अत्यंत चांगले नियोजन करुन कार्यक्रम यशस्वी केले आहेत. आजच्या या युवक संघटनेतूनच उद्याचे सामाजिक कार्यकर्ते तयार होत असतात. त्यामुळे

जास्तीत जास्त युवकांनी संघटनेचे सदस्यत्व स्विकारावे अशी कार्यकारिणी तर्फे युवकांना विनंती आहे.

**भगवान श्री विष्णु मूर्तीची व श्री पंचमुखी मारुती मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना :**

या मंदिरातील श्री विष्णू भगवानची मूर्ती अभिषेक इ. कारणांनी खरबडीत झाली होती. त्यामुळे श्री विष्णूमूर्ती वज्रलेप करुन घेतली तसेच मूर्तीच्या डोळ्यांचेही काम करुन घेतले. सदर काम करण्यासाठी आधी मूर्तीची विधीवत पूजा अर्चा केली होती.

नंतर वज्रलेपाचे काम पूर्ण झाल्यावर भगवान श्री विष्णूच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना दि. २० मे २००५ रोजी करण्यात आली. त्याच दिवशी श्री विष्णू मंदिरात असलेल्या श्री पंचमुखी मारुतीच्या मूर्तीचीही विधीवत प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली.

या दिवशी प्राणप्रतिष्ठापनेनिमित्त संपूर्ण समाज बांधवांस महाप्रसादाचा (भोजनाचा) कार्यक्रम होता. सुमारे १५०० समाज बांधवांनी महाप्रसादाचा या दिवशी लाभ घेतला.

**श्री सुभाननाथ महाराज उत्सव :**

सदर उत्सव दरवर्षी साजरा केला जातो. पूर्वी श्रावणी अमावस्येस या उत्सवानिमित्त समाज बंधु-भगिनींना भोजनाचा महाप्रसाद दिला जात असे. मध्यंतरी महाप्रसादाचा कार्यक्रम श्री सहस्रार्जुन जयंतीस घेतल्याने श्री सुभाननाथ महाराज उत्सव साधेपणाने साजरा होत असे. कार्यकारिणीने या उत्सवादिवशी ही सर्व समाज बांधवांना भोजनाचा महाप्रसाद दरवर्षी देण्याचे ठरविले. त्यानुसार यावेळी समाज बांधवांना महाप्रसादाचे भोजन देण्यात आले. सुमारे १५०० समाज बांधवांनी याचा लाभ घेतला. या उत्सवानिमित्त श्री सत्यनारायण महापूजाही करण्यात आली होती. सदर कार्यक्रम ३ सप्टेंबर २००५ रोजी झाला.

**नवरात्र महोत्सव :**

यावर्षी स्वारगेट येथील श्री दशमुखी व विजया देवीचा नवरात्र महोत्सव दिनांक ४/१०/२००५ ते १२/१०/२००५ पर्यंत मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावर्षी हा महोत्सव सौ. वासंती जगदीश खत्री यांचे अध्यक्षतेखालील नवरात्र महोत्सव समितीने यशस्वीरित्या पार पाडला. यावर्षी गर्दीचा उच्चांक झाला.

दररोज मान्यवरांच्या हस्ते रात्री ८.३० वा. आरती करण्यात येत होती. दुपारी/संध्याकाळी भजनी मंडळाचे कार्यक्रम तसेच रात्री गरबाचे आयोजन करण्यात आले होते.

**नवरात्र महोत्सव समिती**

| | |
|---|---|
| अध्यक्षा | : सौ. वासंती जगदीश खत्री |
| सदस्य | : सौ. स्नेहलता अरूण पवार (विश्वस्त सल्लागार) |
| सदस्य | : सौ. प्रमिला वामन पवार (अध्यक्षा, महिला मंडळ) |
| सदस्य | : सौ. सुचित्रा सुनिल वाळवेकर |
| सदस्य | : सौ. सुरेखा दिलीप चव्हाण |
| सदस्य | : सौ. आशा संतोष चव्हाण |
| सदस्य | : सौ. गिता जवाहर धोंगडी |

**कोजागिरी पौर्णिमा :**

दुपारी १२ वा. देवी मंदीरात होमहवन श्री. व सौ. वासंती जगदीश खत्री यांचे हस्ते करण्यात आले. सायंकाळी दुग्धपानाचा कार्यक्रमास समाज बंधू-भगिनी व बाळगोपाळ मोठ्या संख्येने हजर होते. यावेळी दुग्धपान कार्यक्रम महिला मंडळाच्या उपाध्यक्षा सौ. सुचित्रा सुनिल वाळवेकर यांचे मार्गदर्शनाखाली यशस्वी पार पडला. सौ. वाळवेकर व त्यांना मदत करणाऱ्या महिला मंडळाच्या सर्व महिलांचे हार्दिक अभिनंदन !

**श्री राजराजेश्वर सहस्रार्जुन जयंती :**

दरवर्षीप्रमाणे (कार्तिक शु. ७) ८ नोव्हेंबर २००५ रोजी श्री सहस्रार्जुन जयंती साजरी करण्यात आली. यावर्षी श्री राजराजेश्वर सहस्रार्जुन महाराजांचा रथ उत्कृष्ठरित्या सजविण्यात आला होता. यावेळी प्रथमच रथाचे सारथ्य करण्याचे काम दानशूर ज्येष्ठ समाज बंधू श्री. कृष्णातसा सगनसा कटारे यांनी पार पाडले. मिरवणूक सकाळी ९.३० वा. गंजपेठ येथून निघाली. फटाके, चौघडा, बँड पथकाच्या जल्लोषात श्री. कटारेंच्या हस्ते आरती केल्यानंतर मिरवणूकीस प्रारंभ झाला. मिरवणूकीत युवक संघटना, शिक्षणमंडळ, सहस्रार्जुन नागरी पतसंस्था, महीला मंडळ, सामील झाले होते. मिरवणूकीत जवळजवळ ५०० समाज बंधू-भगिनी, युवक-युवती, बालके सामील झाली होती. मिरवणूक दु. १२.३० वा. चे सुमारास स्वारगेट येथे पोहोचली.

यावर्षी कार्यकारिणीने श्री सहस्रार्जुन महाराजांची आरती करण्याचा मान बोली करुन देण्याची प्रथा सुरु करण्याचे ठरविले होते. या नविन प्रथेची माहिती फारच थोड्या समाजाबांधवांना होती. तरीही अनेक समाजबांधवांनी उत्स्फूर्त पणे बोलीत भाग घेतला. आपल्या समाजाचे अध्यक्ष श्री. गजाननसा अर्जुनसा शालगर यांनी रु. ५,१०१/- ची सर्वोच्च बोली बोलून या वर्षीच्या आरतीचा मान पटकविला.

यानंतर सौ. शितल व श्री. गजानन अर्जुनसा शालगर यांच्या हस्ते आरती करण्यात आली. त्यावेळी त्यांच्या मातोश्री श्रीमती सुभद्रा अर्जुनसा शालगर व्यासपीठावर उपस्थित होत्या. यावेळी सहस्रार्जुन महाराजांचा आशीर्वादरुपी हार श्री. गजाननसा शालगर यांना देण्यात आला.

यानंतर सुमारे सव्वा वाजता महाप्रसादास सुरुवात झाली. यावेळी अपेक्षेपेक्षा जास्त समाज बंधु-भगिनी महाप्रसादास उपस्थित होते. ३००० चे वर समाज बांधवांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

सायंकाळी ६ वा. युवकसंघटना व महिला मंडळ यांनी आयोजित केलेल्या स्पर्धा सप्ताहातील विजेत्यांना पारितोषिके सौ. हेमलता चंद्रशेखर पडवळकर यांचे हस्ते देण्यात आली. यावेळी व्यासपीठावर महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ. प्रमिला पवार, ट्रस्टचे अध्यक्ष श्री. गजानन शालगर, पतसंस्थेचे संचालक श्री. स्नेहकांतसा बद्दी, शिक्षण मंडळ अध्यक्ष श्री. दिपक पवार, युवक संघटनेचे अध्यक्ष श्री. संजय चव्हाण उपस्थित होते. श्री. वल्लेश रंगापुरे व सौ. आशा चव्हाण यांनी कार्यक्रमाचे सुत्र संचालन केले.

यानंतर युवक संघटनेतर्फे ऑर्केस्ट्राचा कार्यक्रम झाला. यात आपल्या समाजातील कु. प्रियंका सुनिल चव्हाण, कु. आश्विनी सुनिल चौधरी, कु. पल्लवी कडतन व कु. नम्रता सुनिल बद्दी यांनी बहारदार नृत्य सादर केले तसेच छोट्या बालचमुंनी विविध गुणदर्शन व फॅशन शो सादर करुन उपस्थितांची वाहवा मिळविली. रात्री १० वाजता कार्यक्रमाची सांगता झाली.

## ट्रस्टचे नियोजित उपक्रम

## भव्य वधु-वर परिचय मेळावा दिनांक ७ व ८ जानेवारी २००६

मा. समाजबंधु भगिनींनो,

'विवाह'! प्रत्येक व्यक्तिच्या जीवनात येणारे हे सर्वात महत्त्वाचे वळण असते. हे वळण घेण्यापूर्वी बरीच पूर्वतयारी करावी लागते. कारण या वळणानंतर व्यक्तिचे आयुष्यच बदलून जाते. विशेषत: वधूचे विवाहानंतरचे नाव, पत्ता, आर्थिक परिस्थिती, राहणीमान सर्वच गोष्टी बदलू शकतात. त्यामुळे विवाहापूर्वी वधूचे माता-पिता काहीशा काळजीतच सुयोग्य वराचा शोध घेत असतात.

परंतु आपला समाज संपूर्ण महाराष्ट्रातच नव्हे तर भारतभर फार मोठ्या प्रमाणात विखुरलेला आहे. नोकरीच्या व व्यवसायाच्या निमित्ताने तो स्वत:चे मूळ गाव सोडून इतरत्र स्थायिक झाला आहे. त्यामुळे त्याच्याबाबतची सविस्तर माहिती एकाच ठिकाणी मिळणे ही मोठी दुरापास्त गोष्ट झाली आहे. त्यामुळेच वधु किंवा वरांना स्वत:साठी सुयोग्य जीवनसाथी शोधताना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. या अडचणींवर मात करण्यासाठी एकमेव सुयोग्य मार्ग म्हणजे **'वधु-वर परिचय मेळावा'!**

पुणे हे महाराष्ट्रातील सर्व समाजबांधवांसाठी प्रवासाच्या दृष्टीने मध्यवर्ती ठिकाण ठरते. अशा ठिकाणी भव्य वधु-वर परिचय मेळावा घेतल्यास ती विवाहेच्छुक वधु-वर व पालकांसाठी एक पर्वणीच ठरेल. हा विचार करुनच श्री सो. स. क्षत्रिय समाज (ट्रस्ट), पुणे या पुण्याच्या विश्वस्त मंडळाने पुणे ग्रामसभेच्या वतीने हा मेळावा आयोजित करण्याचे ठरविले आहे, तरी या मेळाव्यात जास्तीत जास्त विवाहेच्छुक वधु-वर व पालकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन मेळावा यशस्वी करावा, ही विनंती.

शनिवार दि. ७ व रविवार दि. ८ जानेवारी २००६ रोजी समाजातील विवाहेच्छुक वधु-वरांचा परिचय मेळावा आयोजित केला आहे. हा मेळावा महाराष्ट्र प्रांतिय स्तरावर राहील. या परीचय मेळाव्यात अखिल महाराष्ट्रातून अनेक वधू-वर व त्यांचे पालक सहभागी होणार आहेत. पुण्यातील विवाहेच्छुक वधू-वर व पालकांनी या परिचय मेळाव्यात अवश्य भाग घ्यावा. प्रत्येक वधु अथवा वरासाठी नोंदणी फी रु. १५१/- असून त्यात त्यांच्या दोन पालकांनाही प्रवेश असेल. नोंदणी सुरु असून नोंदणी फॉर्मस् कार्यालयात दूपारी ४ ते सायं. ७ वाजेपर्यंत उपलब्ध आहेत.

या उपक्रमात सहभागी समाज बांधवांनीही यथायोग्य हातभार लावावा, ही विनंती.

या मेळाव्याच्या ठिकाणास **'कै. डॉ. प्रकाश भुजंगसा त्रिमल नगर'** असे नाव देऊन डॉ. प्रकाश त्रिमल यांच्या समाज कार्याचा गौरव करण्यात येणार आहे.

वधु-वर आयोजनासाठी पुढीलप्रमाणे समिती नेमण्यात आली आहे.

समिती प्रमुख - श्री. रत्नाकरसा हिरालालसा झाड

- सदस्य -

| | | |
|---|---|---|
| श्री. राजनसा दौ. चव्हाण | श्री. मोतीलालसा सि. कोल्हापुरे | श्री. संजयसा रा. चव्हाण |
| सौ. प्रमिला वा. पवार | सौ. स्मिता गो. जितुरी | सौ. मीना दि. वाळवेकर |
| श्री. विठ्ठलसा गो. कमलापुरे | श्री. जगदीशसा कृ. पवार | श्री. भास्करसा ना. दलभंजन |
| | श्री. सुधाकरसा क्षत्रिय | |

# सार्वजनिक मौंजीबंधन

दिनांक ३१ जानेवारी २००६ रोजी पुणे ग्राम सभेचे वतीने पुणे ग्रामसभेतील बटुंसाठी सार्वजनिक मौंजीबंधनाचा कार्यक्रम आयोजित केला आहे. या उपक्रमासाठी नाव नोंदणी १५ ऑगस्ट पासून सुरु झालेली आहे. नांव नोंदणीसाठी रु. १०१/- आकारण्यात येतील नाव नोंदणीचे छापील फॉर्म्स समाजाचे ऑफिसमध्ये (सायं. ४ ते ७) उपलब्ध आहेत. तरी समाज बांधवांनी याचा लाभ घ्यावा. लाभार्थी समाज बांधवांनीही या उपक्रमास आर्थिक हातभार लावावा, ही विनंती. बटूचे वय किमान ७ वर्ष पूर्ण असावे.

या दोन्ही उपक्रमासाठी ट्रस्टला भरघोस पाठींबा मिळत आहे. वधु-वर मेळाव्यात दोन वेळच्या जेवणासाठी कै. बाबुरावसा उर्फ बाळाजी भवानसा वाळवेकर व कै. शंकरसा बाळाजी वाळवेकर यांचे स्मरणार्थ रु. १,०१,०००/- देणगी वाळवेकर कुटुंबियांतर्फे देण्याचे जाहिर केले आहे. तसेच मे. पिनॅकल कन्स्ट्रक्शन ग्रुप तर्फे श्री. गजेंद्र दत्तुसा पवार यांनी आपले वडील कै. दत्तुसा बाबुसा पवार यांचे स्मरणार्थ मौजीबंधन कार्यक्रमासाठी (नगर नावासाठी व भोजन समारंभासाठी) रु. १,२५,०००/- देण्याचे जाहिर केले आहे.

तसेच श्री सहस्त्रार्जुन नागरी सहकारी पतसंस्था, पुणे यांनीही या उपक्रमांसाठी रु. ५१,०००/- देण्याचे जाहीर केले आहे.

तसेच खडकी येथील व्यापारी समाज बंधुंनी मिळून रु. ११,०००/- जाहीर केले आहे व श्री. जगदीश खत्री, भोसरी यांनीही रु. ५,०००/- दिले आहेत.

या सर्व देणगीदारांचे ट्रस्ट तर्फे हार्दिक आभार ! तसेच इतरही सर्व समाज बांधवांनी सढळ हाताने या उपक्रमास मदत करावी, ही विनंती. त्याचप्रमाणे समाजबांधवांनी वधु-वर मेळावा, मौंजीबंधन तसेच समाजामध्ये नियमीतपणे होणाऱ्या इतर सामाजिक उपक्रमांमध्ये स्वत:चा वेळ देऊन सक्रिय सहभाग घ्यावा ही विनंती. अशा रितीने सहकार्यासाठी पुढे येणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांचे स्वागतच केले जाईल. किंम्बहुना आजच्या परिस्थितीत अशा कार्यकर्त्यांची नितांत आवश्यकता आहे, याची नोंद समाजबांधवांनी घ्यावी.

समिति प्रमुख - श्री. अशोकसा वि. चव्हाण

| | | |
|---|---|---|
| श्री. श्रीकांतसा कृ. कटारे | श्री. राजेंद्रसा म. बद्दी | श्री. दिपकसा द. पवार |
| श्री. नरेंद्रसा ज. आरसिद्ध | श्री. गोपाळसा ग. चव्हाण | श्री. अशोकसा हि. मिस्कीन |
| श्री. अनंतसा गो. कटारे | श्री. विजयसा रा. झाड | श्री. अरुणसा सि. कोल्हापुरे |
| | श्री. अशोकसा बं. वखारे | |

# श्री सो. स. क्षत्रिय समाज युवक संघटना, पुणे

सन्माननीय समाज बंधु आणि भगिनींनो,

युवक संघटनेतर्फे आपणा सर्वांना दिपावली व नूतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !

आपणासर्वांना माहीत आहे की, या वर्षी दिनांक १५ ऑगस्ट २००५ रोजी झालेल्या युवक मेळाव्यामध्ये नूतन युवक संघटनेची स्थापना झाली. सदर मेळाव्यात संघटनेतील सर्व माजी पदाधिकाऱ्यांचा सत्कार श्री सो. स. क्षत्रिय समाज ट्रस्ट तर्फे करण्यात आला.

थोड्याच दिवसांमध्ये युवक संघटनेने परंपरागत चालू असलेल्या समाजाचा ''श्री गणेशोत्सव'' हा उत्सव उत्साहात साजरा केला. सदर कार्यक्रमात समाजातील सर्व लहान थोर समाज बंधु-भगिनी भव्य संख्येने सामील झाल्या होत्या.

समाजाच्या नवरात्र उत्सवामध्ये सुद्धा युवक संघटनेने भरीव सहभाग दिला.

यानंतर दरवर्षीप्रमाणे यंदाही युवक संघटनेने श्री सहस्रार्जुन जयंतीनिमित्त स्पर्धा सप्ताहांचे भव्य आयोजन केले. सदर कार्यक्रमात समाजातील सर्वच लहान-थोर समाज बंधु-भगिनींनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला व कार्यक्रम अत्यंत यशस्वीरित्या पार पाडण्यास सहकार्य केले. असेच सहकार्य करुन समाज बांधवांनी युवकांचा उत्साह वाढवावा, ही नम्र विनंती.

ट्रस्टतर्फे घेण्यात येणाऱ्या मौंजीबंधन व वधु-वर परिचय मेळाव्यात युवक संघटनेचा पूर्णपणे सहभाग असेल, तसेच समाजातील सर्व उपसंस्थांच्या कार्यक्रमात संघटनेचा पूर्ण सहभाग राहील.

या कार्यक्रमात जास्तीत जास्त युवकांनी सहभाग घेऊन कार्यक्रम यशस्वी करावा, ही विनंती.

युवक संघटना यापुढे वेळोवेळी घेण्यात येणाऱ्या नवनवीन उपक्रमांची माहिती कळवित राहीलच. युवक सभासद नोंदणी चालू आहे, तरी जास्तीतजास्त युवकांनी आपली नांवे संघटनेत नोंद करावी, ही नम्र विनंती.

संजय चव्हाण

अध्यक्ष

# श्री सो. स. क्षत्रिय समाज युवक संघटना, पुणे

## ✿ कार्यकारिणी ✿

| | |
|---|---|
| श्री. संजय रामकृष्णसा चव्हाण | अध्यक्ष |
| श्री. मनीष अरुणसा कोल्हापुरे | उपाध्यक्ष |
| श्री. पंकज रामभाऊसा पांढरे | सचिव |
| श्री. विजय नंदकुमारसा चौधरी | उपसचिव |
| श्री. मनोज गुरुनाथसा आरसिद्ध | खजिनदार |
| श्री. लक्ष्मीकांत बाळासाहेब पेंदू | हिशोब तपासनीस |
| श्री. उज्वल नरसिंगसा कमलापुरे | सदस्य |
| श्री. राहुल महादेवसा कोसंदर | सदस्य |
| श्री. योगेश विश्वनाथसा भांडगे | सदस्य |
| श्री. सचिन प्रभाकरसा क्षत्रिय | सदस्य |

## युवकांना आवाहन

युवकांनो झोपा सोडा, जागृत व्हा !
सहस्रार्जुनाचा जयजयकार करा ! शूर व्हा ! उठा !
संघटित व्हा ! संघटनेत सामील व्हा !
तुमच्यासाठी ! समाजासाठी !
आपल्यासाठी समाजाने काय केले यापेक्षा
आपण समाजासाठी काय करु ?
हे महत्त्वाचे !

# श्री सो. स. क्षत्रिय शिक्षण मंडळ, पुणे

सन्माननीय समाज बंधु आणि भगिनींनो, सप्रेम प्रणाम !

शिक्षण मंडळाचे हे ७३ वे वर्ष असून कार्याची माहिती आपणास थोडक्यात देत आहे. शिक्षण मंडळाचा इतिहास सोनेरी असून अनेक थोर मंडळींनी काम करुन शिक्षण मंडळाला नावारुपास आणले आहे.

आज शिक्षण मंडळ फक्त वह्या-पुस्तके वाटणारे मंडळ राहिले नसून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण गरजा पूर्ण करणारे त्यांना आर्थिक मदतीसह, योग्य ते मार्गदर्शनही मिळवून देणाऱ्या अशा परिपूर्ण संस्थेत त्याचे रुपांतर होत आहे.

शिक्षण मंडळाने स्थापनेपासून आपला कारभार हळुहळू वाढविला आहे.

आज शिक्षण मंडळ विद्यार्थ्यांसाठी पुढील प्रमाणे उपक्रम राबवीत आहे.

१) मोफत वह्या-पुस्तके वाटप.
२) गरजूंना गणवेष वाटप.
३) गरजूंना शालये फी.
४) उच्च शिक्षणासाठी 'शैक्षणिक बिनव्याजी कर्ज' योजना.
५) संगणक प्रशिक्षण वर्ग.

शिक्षण मंडळ कोणत्याही विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकनास होऊ नये, (शिक्षणात खंड पडू नये.) म्हणून सदैव जागृत असते. किमान आर्थिक कारणांसाठी तरी नुकसान होऊ नये, म्हणून प्रयत्नशील असते.

आज शिक्षण मंडळ 'हिरक महोत्सव' च्या दिशेने यशस्वी वाटचाल करीत आहे. लवकरच आपण हिरक महोत्सवी वर्ष साजरा करणार आहोत. त्या दृष्टीने 'आजीवन सदस्यांचा मेळावा' घेण्यात येणार आहे. तरी जास्तीत जास्त लोकांनी लवकरात लवकर 'आजीवन सदस्य' व्हावे ही विनंती.

शिक्षण मंडळाच्या कार्याला आपले श्री सो.स.क्षत्रिय समाज ट्रस्ट करीत असलेल्या आर्थिक मदतीमुळे मोठा हातभार लागतो.

समाजातील सुप्रसिद्ध नामांकीत व्यक्ती, गरीब, होतकरु पण हुशार विद्यार्थ्यांचा शैक्षणिक खर्च करण्यास तयार आहेत. कृपया अशा विद्यार्थ्यांनी शिक्षण मंडळाशी संपर्क साधावा.

समाजातील बंधू-भगिनींनी नविन शैक्षणिक उपक्रमाविषयी योजना सुचविल्यास अथवा आमच्या कार्यातील त्रुटीबद्दल सूचना केल्यास त्याचीही नोंद घेण्यात येईल. कृपया आपण आपले विचार आम्हाला अवश्य कळवावेत.

दिपक दत्तुसा पवार
अध्यक्ष

## श्री सो. स. क्षत्रिय शिक्षण मंडळ, पुणे

### ✿ कार्यकारिणी ✿

| | |
|---|---|
| *अध्यक्ष* | *श्री. दिपक दत्तुसा पवार* |
| *उपाध्यक्ष* | *श्री. किशोर महादेवसा चौधरी* |
| *सचिव* | *कु. सागर दिलीपसा चव्हाण* |
| *खजिनदार* | *कु. संतोष माणिकसा बाकळे* |
| *सदस्य* | *कु. विवेक नारायणसा पवार* |
| *सदस्य* | *श्री. अमृत राजेंद्र आरसिद्ध* |
| *सदस्य* | *सौ. लीना नितीन मामर्डे* |
| *सक्रीय कार्यकर्ते* | *कु. वासंती सुर्यकांतसा रंगरेज* |
| *सक्रीय कार्यकर्ते* | *कु. सुरज रामदाससा झाड* |
| *सक्रीय कार्यकर्ते* | *कु. गिरीष विश्वनाथसा चव्हाण* |

### ✿ आवाहन ✿

श्री सो. स. क्षत्रिय शिक्षण मंडळातर्फे 'आजीवन सदस्य' योजना यशस्वी रित्या चालू आहे. या योजनेत आपण फक्त एकदाच रु. ५००/- (पाचशे रुपये) देणगी देऊन 'आजीवन सदस्य' व्हावे. या जमलेल्या निधीच्या व्याजावर आपण विद्यार्थ्यांना आर्थिक मदत करीत असतो.

तरी शिक्षण मंडळ सर्व समाज बांधव व भगिनींना आवाहन करीत आहे की, आपण स्वत:हून शिक्षण मंडळाचे आजीवन सदस्यत्व स्विकारुन समाजातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षण निधी उभा करण्याकरीता सहकार्य करावे, ही विनंती.

# श्री सो. स. क्षत्रिय समाज महिला मंडळ, पुणे

सन्माननीय समाज बंधु आणि भगिनींनो, सप्रेम नमस्कार,

आपणांस हे सांगण्यास आम्हाला अभिमान वाटतो की, आम्ही विविध कार्यक्रम स्वारगेट येथे घेतो. २६ जानेवारी आणि १५ ऑगस्टला सकाळी ८ वाजता झेंडावंदन असते. झेंडावंदनाला महिलांची उपस्थिती असते. २६ जानेवारीला संक्रांत निमित्त समाज बांधवांसाठी तिळगुळ आणि महिलांसाठी हळदी-कुंकू हे कार्यक्रम असतात. या मध्येच महिला मंडळाने ठरविलेला कार्यक्रम म्हणजे ज्यांनी नातसून पाहिली असेल त्या आजींचा व २५ वर्षे एकत्रित असलेल्या कुटुंबांचा सन्मान करण्यात येतो.

त्यानंतर महाशिवरात्री येते त्यादिवशी संध्याकाळी ६ वा. 'ॐ नमः शिवाय' चा १०८ जप आणि ८ मार्च रोजी महिलादिन साजरा करण्यात येतो. श्री रामनवमी दु. १२ वा. साजरी करण्यात येते. नंतर आषाढी आरती व नैवेद्य पौर्णिमा झाल्यावर पहिल्या मंगळवारी दु. १ वा. करण्यात येते. नागपंचमीला संध्याकाळी ६ वा. नागाची प्रतिकृती काढून पूजा करण्यात येते. दरवर्षीप्रमाणे श्रावणी तिसऱ्या शुक्रवारी संध्या ६ वा. हळदी-कुंकूवाचा कार्यक्रम असतो. गोकुळ अष्टमी रात्री १२ वा. साजरी करण्यात येते. नवरात्रामध्ये ५ व्या माळेला भोंडला होतो आणि खिरापत वाटली जाते. ९ दिवस रोज रात्री ९ ते १२ दांडिया खेळला जातो. या महिला मंडळाच्या प्रत्येक कार्यक्रमाला महिलांची उपस्थिती असते. या कार्यक्रमाला येणारा खर्च आम्हा महिला मंडळाला ट्रस्टकडून देण्यात येतो.

विशेष कार्यक्रमाबाबत विशेष म्हणजे यावर्षी पुणे समाज महिला मंडळाने प्रथमच रामनवमी दिवशी बाळांचे सामुहीक बारशे करुन दिले, भंडारा केला. या महाप्रसादाचा लाभ बरेच समाज बांधव व भगिनींनी घेतला. मोठ्या थाटात बाळांचे ''नामकरण विधी'' पार पडले. त्यास प्रतिसाद चांगलाच लाभला.

क्षत्रिय भवन गंज पेठ येथे दर शनिवारी सायं. ५ ते ६ बाल संस्कार केंद्र चालू आहे. वयोगट ४ ते १०. बाल संस्कार केंद्रात मुलांना दुध व खाऊ वाटप सुद्धा होते. महिलांची संघटना वाढविण्याचा विचार आहे. विविध कार्यक्रम राबविण्याचा विचार आहे. जसे शिवणक्लास, मेहंदी क्लास, योगासन वगैरे यासाठी समाजातील महिलांनी वरील उपक्रमांना उपस्थित राहून सक्रिय सहभाग घ्यावा, ही विनंती.

**सौ. प्रमिला वामनसा पवार**
अध्यक्षा

## श्री सो. स. क्षत्रिय समाज महिला मंडळ, पुणे

–० कार्यकारीणी मंडळ ०–

| | | |
|---|---|---|
| अध्यक्षा | : | सौ. प्रमिला वामनसा पवार |
| उपाध्यक्षा | : | सौ. सुचित्रा सुनिलसा वाळवेकर |
| सचिव | : | सौ. सुरेखा दिलीपसा चव्हाण |
| उपसचिव | : | सौ. शशिकला सुनिलसा झाड |
| खजिनदार | : | सौ. आशा संतोषसा चव्हाण |
| हिशेब तपासनीस | : | सौ. वंदना हिरालालसा धोंगडी |
| सदस्य | : | सौ. पुष्पा अशोकसा वखारे |
| सदस्य | : | सौ. शोभा चंद्रकांतसा काटवे |
| सदस्य | : | सौ. विद्या नरेंद्रसा कुक्कर |
| सदस्य | : | सौ. शशिकला नारायणसा आरसिद्ध |
| सदस्य | : | सौ. विजया मदनसा बोजगीरे |

–० सल्लागार ०–

श्रीमती माया डोंगरसा वाळवेकर

सौ. मीना दिलीप वाळवेकर — सौ. चंद्रकला बाळासाहेब झाड

सौ. स्मिता गोपाळकृष्ण जितुरी — सौ. गीता जवाहरसा धोंगडी

---

महिला मंडळातर्फे सर्व प्रकारचे
पापड, लोणचे, मिरची पावडर व धनीया पावडर
विक्री चालू आहे.

## श्री सहस्रार्जुन नागरी सहकारी पतसंस्था मर्या., पुणे

यावर्षी श्री सहस्रार्जुन नागरी सहकारी पतसंस्था रौप्य महोत्सव साजरा करीत आहे. आपल्या समाजाला अभिमान वाटावा अशी प्रगती पतसंस्थेने अलीकडच्या काळात केली आहे. श्री. अशोक विठ्ठलसा चव्हाण यांचे तडफदार नेतृत्वाखाली संचालक मंडळाने ही भरीव कामगीरी केली आहे. या अल्पावधीत पतसंस्थेने स्वतःच्या मालकीच्या वास्तुत आपले कामकाज सुरु केले आहे. अल्पावधीत भाग भांडवल रु. ५ कोटी, रु. ४ कोटीचे वर ठेवी व रु. १६ कोटीचे वर उलाढाल केली आहे. या कामगिरीसाठी संचालक मंडळाचे ट्रस्टच्यावतीने हार्दिक अभिनंदन !

तपशील खालीलप्रमाणे -

### मागील ४ वर्षातील संस्थेच्या प्रगतीचा आढावा

| तपशील | २००१-०२ | २००२-०३ | २००३-०४ | २००४-०५ |
|---|---|---|---|---|
| सभासद | १,५८९ | १,७३२ | २,१४५ | २,१७३ |
| भाग भांडवल | २८,३५,८०० | ३८,४९,६०० | ४६,७१,६०० | ४९,५३,१०० |
| कर्ज वाटप | १,२०,८६,७४५ | १,६५,९९,६५८ | १,८३,९८,६८२ | १,६१,८३,३४७ |
| कर्ज वसुली | ९१,६५,९०० | १,०९,९९,६०३ | १,१४,९५,४३० | १,६४,८१,०६३ |
| कर्ज येणे | १,८०,४५,०२५ | २,३६,४५,०८० | ३,०५,४८,३३२ | ३,०२,५०,६१६ |
| ठेवी | १,८६,९५,१६९ | २,३९,७३,५६६ | ३,६७,९१,६५९ | ३,९७,१२,७२९ |
| संस्थेस झालेला नफा | ४,८७,२४२ | ६,०८,८६६ | ७,०५,९७६ | १२,६६,५७४ |
| लाभांश दर | १२% | १२% | १०% | १२% |
| ऑडीट वर्ग | 'अ' | 'ब' | 'ब' | 'ब' |

संस्थेचे रौप्य महोत्सवी वर्ष असल्याने संस्थेने सभासदांसाठी अनेक
नविन कर्ज योजना व स्किम जाहीर केल्या आहेत.

**गृह कर्ज रु. ३,००,००० (तीनलाख) — अर्धा तोळे सोने भेट**

**गृह कर्ज रु. ५,००,००० (पाचलाख) — एक तोळा सोने भेट**

**गृह कर्जावर आकर्षक व्याजदर १०%**

# श्री सहस्रार्जुन नागरी सहकारी पतसंस्था मर्या., पुणे

## ✿ कार्यकारी संचालक मंडळ ✿

| | |
|---|---|
| श्री. अशोक वि. चव्हाण | अध्यक्ष |
| श्री. श्रीकांत शं. शालगर | उपाध्यक्ष |
| श्री. हेमंत चं. खेरुड | मानद सचिव |
| श्री. शशिकांत रा. मैत्राणी | सदस्य |
| श्री. कृष्णात ना. दलभंजन | सदस्य |
| श्री. स्नेहकांत न. बद्दी | सदस्य |
| श्री. मोतीलाल सि. कोल्हापुरे | सदस्य |
| श्री. नारायण रा. काटकर | सदस्य |
| सौ. स्मिता गो. जितुरी | संचालिका |
| सौ. मीना दि. वाळवेकर | संचालिका |
| श्री. विजय शं. हदगल | सदस्य |

सर्व सभासद, ठेवीदार, हितचिंतक

व

समाज बांधवांना

सर्व स्टाफ व कार्यकारिणी तर्फे नविन वर्षाच्या

हार्दिक शुभेच्छा !

## श्री सोमवंशीय सहस्रार्जुन

३१ मार्च २००५ ला संपणाऱ्या

| व्यय | रुपये | रुपये |
|---|---|---|
| मालमत्तेसंबंधी खर्च | | १९१२८२.०० |
| कॉर्पोरेशन टॅक्स | १६१९६.०० | |
| दुरुस्ती व व्यवस्था (सूची क्र. १ प्रमाणे) | ३३६५३.०० | |
| इलेक्ट्रिकल खर्च व लाईट बिल्स व देखभाल | २५६००.०० | |
| कर्जावरील व्याज (सोलर वॉटर हिटर) | ४२.०० | |
| अवमूल्यन (सूची क्र. ८ प्रमाणे) | ११५७९१.०० | |
| व्यवस्थापन खर्च (सूची क्र. २ प्रमाणे) | | १४२९८१.६८ |
| कायदेविषयक / कोर्ट खर्च | | ६०४४१.०० |
| कॉन्ट्रीब्युशन फी | | १९६९१.०० |
| किरकोळ खर्च | | ५२१.०० |
| ट्रस्टच्या उद्देशावर केलेला खर्च | | २४६१५८.३९ |
| धार्मिक खर्च (सूची क्र. ३ प्रमाणे) | १०२०४६.८९ | |
| देणगी (सूची क्र. ४ प्रमाणे) | १४४१११.५० | |
| एकूण | | ६६१०७५.०७ |

श्री. गजानन अ. शालगर अध्यक्ष — श्री. संदिप मो. चव्हाण सचिव

राजेंद्र मनोहरसा झाड खजिनदार — एन. बी. शहा ॲन्ड कं. चार्टर्ड अकौंटंट

## क्षत्रिय समाज (ट्रस्ट) पुणे

वर्षाकरिता आय-व्यय लेखा

| आय | रुपये | रुपये |
|---|---|---|
| भाडे उत्पन्न | | २०१८६७.२० |
| पोस्ट ऑफिस | ४५८८०.२० | |
| कार्यालय भाडे (स्वारगेट व क्षत्रिय भवन) | १५५९८७.०० | |
| बँक व्याज | | २५८२.०० |
| कॅनरा बँक बचत खाते क्र. ६२८ | ४५४.०० | |
| विश्वेश्वर बँक बचत खाते क्र. १३२०२ | २१२८.०० | |
| देणगी जमा | | २३४१२.२५ |
| इतर उत्पन्न | | ४८५७५.२५ |
| दक्षिणा पेटी | ४२०४४.२५ | |
| किरकोळ उत्पन्न | | |
| - साडी, खण, नारळ इ. ची विक्री | ५०२५.०० | |
| - तक्रार अर्ज | ४२.०० | |
| - लग्न हक्क | ७१४.०० | |
| - साखरपुडा हक्क | २७०.०० | |
| - खुर्ची भाडे | ३८०.०० | |
| - भांडी भाडे | १००.०० | |
| तुट | | |
| उत्पन्ना पेक्षा अधिक झालेला खर्च | | ३८४६३८.३७ |
| **एकूण** | | **६६१०७५.०७** |

अशोकसा रंगापुरे - उपाध्यक्ष, राजेंद्र बद्दी - उपसचिव, राजेंद्र चव्हाण - हिशोबतपासनीस,

- सदस्य -

राजा पवार, श्रीकांत कटारे, मोतीलालसा कोल्हापुरे, अनिल पवार, राजेंद्र हबीब

## श्री सोमवंशीय सहस्रार्जुन

३१ मार्च २००५ ला संपणाऱ्या

| निधी आणि देयता | रुपये | रुपये |
|---|---|---|
| ट्रस्ट फंड | | १९९७३२.४१ |
| इतर फंड | | ३७८१४६५.८० |
| इमारत नुतनीकरण फंड | २९०९३२९.८० | |
| चालू वर्षातील तरतूद | ८७२१३६.०० | |
| डिपॉझीट (सूची क्र. ७ प्रमाणे) | | २८,८००.०० |
| एकूण | | ४००९९९८.२१ |

श्री. गजानन अ. शालगर अध्यक्ष — श्री. संदिप मो. चव्हाण सचिव

राजेंद्र मनोहरसा झाड खजिनदार — एन. बी. शहा ॲन्ड कं. चार्टर्ड अकौंटंट

## क्षत्रिय समाज (ट्रस्ट) पुणे

वर्षाचे स्थिती विवरण

| मालमत्ता | रुपये | रुपये |
|---|---|---|
| चल व अचल मिळकत | | १६५६८५४.०० |
| (सुची क्र. ८ प्रमाणे) | | |
| गुंतवणुक | | १००००००.०० |
| आय. एफ. सी. आय. बॉन्ड | १००००००.०० | |
| आगाऊ रक्कम व डिपॉझिट | | ४२३२०३.११ |
| टेलीफोन डिपॉझिट | २०००.०० | |
| एम. एस. ई. बी. डिपॉझिट | १८५५०.०० | |
| एस. एस. के. प्रांतिय अधिवेशन | ८०००.११ | |
| विश्वेश्वर बँक एफ.डी. | ३५००००.०० | |
| टी.डी.एस. (होर्डीग भाडे) | ४४,६५३.०० | |
| येणे बाकी | | १७८३५.०० |
| भाडे उत्पन्न येणे (सुची क्र. ५ प्रमाणे) | १७७९३.०० | |
| साखरपुडा हक | ४२.०० | |
| रोख आणि बँकेतील शिल्लक | | २६१४६९.५३ |
| कॅनरा बँक बचत खाते क्र. ६२८ | ४४२३०.३५ | |
| विश्वेश्वर बँक बचत खाते क्र. १३२०२ | २१७१५३.१८ | |
| रोख शिल्लक | ८६.०० | |
| आय व व्यय खाते | | १५५०६३६.५७ |
| आरंभी शिल्लक जमा (तूट) | ११६५९९८.२० | |
| तूट | ३८४६३८.३७ | |
| एकूण | | ४००९९९८.२१ |

अशोकसा रंगापुरे – उपाध्यक्ष, राजेंद्र बद्दी – उपसचिव, राजेंद्र चव्हाण – हिशोबतपासनीस,

– सदस्य –

राजा पवार, श्रीकांत कटारे, मोतीलालसा कोल्हापुरे, अनिल पवार, राजेंद्र हबीब

## श्री सोमवंशीय सहस्रार्जुन क्षत्रिय समाज (ट्रस्ट) पुणे

| सूची तपशील | | रुपये |
|---|---|---|
| **दुरुस्ती व व्यवस्था** (सूची क्र. १) | | |
| | स्वारगेट इमारत हॉल रंगकाम व दुरुस्ती | ५८५६.५० |
| | लग्न हॉल साफ सफाई खर्च | २९५८.५० |
| | स्टेज व स्टोअर रुम दुरुस्ती | २२३९५.०० |
| | इलेक्ट्रिक दुरुस्ती | २४४३.०० |
| | **एकूण** | **३३६५३.००** |
| **व्यवस्थापन खर्च** (सूची क्र. २) | | |
| १ | बँक खर्च | ४८९.१८ |
| २ | सभा खर्च | ५१२१९.५० |
| ३ | पोस्टेज व तार खर्च | ९७०१.५० |
| ४ | छपाई व स्टेशनरी | २३६५.०० |
| ५ | पगार व बोनस (सूची क्र. ६ प्रमाणे) | ७०९००.०० |
| ६ | प्रवास खर्च | ११३७.०० |
| ७ | चहा व इतर खर्च | २१६९.५० |
| ८ | प्रोफेशनल फी | ५०००.०० |
| | **एकूण** | **१४२९८१.६८** |
| **धार्मिक खर्च** (सूची क्र. ३) | | |
| १ | श्री सहस्रार्जुन जयंती उत्सव खर्च | ६३१४०.८९ |
| २ | नवरात्रोत्सव खर्च | १६७५५.०० |
| ३ | विष्णू मूर्ती (वज्रलेप) | ५३०६.०० |
| ४ | प्रजासत्ताक दिन खर्च | ३००.०० |
| ५ | कोजागिरी पौर्णिमा | ५५५७.०० |
| ६ | श्री सुभाननाथ महाराज जयंती | ४८०.०० |
| ७ | श्री हनुमान जयंती व श्री रामनवमी | ३९३८.०० |

## श्री सोमवंशीय सहस्रार्जुन क्षत्रिय समाज (ट्रस्ट) पुणे

| | सूची तपशील | रुपये |
|---|---|---|
| ८ | स्वातंत्र्य दिन खर्च | ६१५.०० |
| ९ | पूजा खर्च | ४०३२.०० |
| १० | इतर स्थानिक उत्सव | ७२३.०० |
| ११ | सत्कार व पुष्पगुच्छ | १००.०० |
| १२ | गणपती उत्सव | ११००.०० |
| | **एकूण** | **१०२०४६.८९** |

**देणगी खर्च** (सूची क्र. ४)

| | | |
|---|---|---|
| १ | श्री सोमवंशीय सहस्रार्जुन क्षत्रिय शिक्षण मंडळ व शैक्षणिक खर्च | ६३२३०.०० |
| २ | श्री सोमवंशीय सहस्रार्जुन क्षत्रिय महिला मंडळ | १०६००.०० |
| ३ | युवक संघटना गणपती मंडळ | ५०००.०० |
| ४ | निराधार सहाय्य योजना | ४८२८१.०० |
| ५ | वैद्यकीय अर्थसहाय्य योजना | १७०००.०० |
| | **एकूण** | **१४४१११.००** |

**भाडे उत्पन्न येणे** (सूची क्र. ५)

| | | |
|---|---|---|
| १ | बबन एच. कारंडे | २७२५.०० |
| २ | भगवानदास एन. चौधरी | ६९०.०० |
| ३ | गिरीधारीलाल डी. शर्मा | ७१७६.०० |
| ४ | गिरीधारीलाल डी. शर्मा (गोडाऊन) | १६५६.०० |
| ५ | गिरीधारीलाल डी. शर्मा (दुकान) | ४९६८.०० |
| ६ | के. बी. हेमाडे | ५७७.५० |
| | **एकूण** | **१७७९३.००** |

# श्री सोमवंशीय सहस्रार्जुन क्षत्रिय समाज (ट्रस्ट) पुणे

| सूची तपशील | रुपये |
|---|---|
| **पगार खर्च** (सूची क्र. ६) | |
| १ पुनम तिवारी | १५२००.०० |
| २ श्री. भरत जगदाळे | ५०००.०० |
| ३ श्री. प्रदिप परदेशी व सौ. शारदा परदेशी | ३१८००.०० |
| ४ श्रीमती पार्वतीबाई पवार | १३०००.०० |
| ५ राजू पवार | ५९००.०० |
| **एकूण** | ७०९००.०० |
| **डिपॉझीट देणे यादी** (सूची क्र. ७) | |
| १ श्री. अंकुश दाभोळकर | २०००.०० |
| २ श्री. अशोक चव्हाण | ५००.०० |
| ३ श्री. बाळासाहेब कांबळे | २०००.०० |
| ४ श्री. ज्ञानेश्वर शिंदे | १०००.०० |
| ५ श्री. गजानन पारखी | २०००.०० |
| ६ श्री. गणपत दरोडे | ८००.०० |
| ७ श्री. हनुमंतसा झाड | १०००.०० |
| ८ श्री. कृष्णासा चव्हाण | २०००.०० |
| ९ श्री. मधुकर माहोरकर | २०००.०० |
| १० श्री. मोहन खांबकर | २०००.०० |
| ११. श्री. नंदकिशोर पवार | २०००.०० |
| १२. श्री. राजेश कुडाळे | २०००.०० |
| १३. श्री. रामभाऊ चव्हाण | १०००.०० |
| १४. श्री. संतोष खंडागळे | २०००.०० |
| १५. श्री. शेखर रापर्ती | १९००.०० |
| १६. श्री. सुभाष दाढे | २१००.०० |
| १७. श्री. उमेश कळंबकर | १०००.०० |
| १८. श्री. विजयसा नाकोड | १५००.०० |
| **एकूण** | २८८००.०० |

## • सूची क्र. ८ : चल अचल मालमत्तेचे विवरण व त्याचे डेप्रिसिएशन ३१ मार्च २००५ •

| क्र. | मालमत्ता | ३१.३.२००४ | नविन गुंतवणूक | एकूण | घसारा दर | घसारा | ३१.३.२००५ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | बोअरवेल | ८८८४.०० | -- | ८८८४.०० | १०% | ८८४.०८ | ८०००.०० |
| २. | बिल्डींग | ८०४२५.०० | -- | ८०४२५.०० | ५% | ४०२२.०० | ७६४०३.०० |
| ३. | मंदिर | ६३९२.०० | -- | ६३९२.०० | १०% | ६३९.०० | ५६८१.०० |
| ४. | बांधकाम खर्च ५७६ गुरुवार पेठ, पुणे ४२ | १३५०१८०.०० | -- | १३५०१८०.०० | ५% | ६७५०९.०० | १२८२६७१.०० |
| ५. | भांडी | ११५९७.०० | -- | ११५९७.०० | १०% | ११६०.०० | १०४३७.०० |
| ६. | देवीचे सोन्याचे दागिने | ८५००.०० | -- | ८५००.०० | -- | -- | ८५००.०० |
| ७. | होर्डिंग फ्रेम | २६२२.०० | -- | २६२२.०० | २०% | ५२४.०० | २०९८.०० |
| ८. | सायकल | ७७३.०० | १८००.०० | २५७३.०० | १०% | २५७.०० | २३१६.०० |
| ९. | टी. व्ही. सेट | २७७५.०० | -- | २७७५.०० | -- | -- | २७७५.०० |
| १०. | पंखा | २०३०.०० | -- | २०३०.०० | २५% | ५०७.०० | १५२३.०० |
| ११. | कॉम्प्युटर | ६४००.०० | -- | ६४००.०० | ६०% | ३८४०.०० | २५६०.०० |
| १२. | ॲम्प्लीफायर व स्पीकर | २५३६.०० | -- | २५३६.०० | २५% | ६३४.०० | १९०२.०० |
| १३. | खुर्च्या | २१२२०.०० | -- | २१२२०.०० | १५% | ३१८३.०० | १८०३७.०० |
| १४. | फर्निचर फिक्स्चर्स | १२०९०९.०० | -- | १२०९०९.०० | १५ % | १८१३६.०० | १०२७७३.०० |
| १५. | डेड स्टॉक | २२४९३.०० | -- | २२४९३.०० | १०% | २२५०.०० | २०२४३.०० |
| १६. | इले. फिटींग्ज | २५७५७.०० | -- | २५७५७.०० | १५% | ३८६३.०० | २१८९४.०० |
| १७. | इले. पंप सेट | ४९२४.०० | -- | ४९२४.०० | २५% | १२३१.०० | ३६९३.०० |
| १८. | स्वारगेट जागेतील नूतनीकरण | ११७३०.०० | -- | ११७३०.०० | -- | -- | ११७३०.०० |
| १९. | सोलर वॉटर हिटर | २१८३२.०० | -- | २१८३२.०० | २५% | ५४५८.०० | १६३७४.०० |
| २०. | स्टील बोर्ड | ८२७४.०० | -- | ८२७४.०० | १०% | ८२७.०० | ७४४७.०० |
| २१. | टेलीफोन युनीट | ३५००.०० | -- | ३५००.०० | २५% | ८७५.०० | २६२५.०० |
| २२. | शेड, स्टेज, कम्पाउंड (स्वारगेट) | ४७१७२.०० | -- | ४७१७२.०० | -- | -- | ४७१७२.०० |
| | एकूण | १७७०८४५.०० | १८००.०० | १७७०८४५.०० | | ११५७११.०० | १६५६८५४.०० |

एन. बी. शहा ॲण्ड कं.
चार्टर्ड अकौंटंटस्
१०९, बुधवार पेठ, पुणे - ४११ ००२.
फोन : (ऑ) ४०२२७५४ मो : ९८२२८८५८२०

# • लेखा परिक्षकाचा अहवाल •

(मुंबई सार्वजनिक विश्वस्त संस्थाचा कायदा कलम ३३ व ३४
आणि नियम १९ अन्वये द्यावयाचा)

आम्ही श्री सोमवंशीय सहस्रार्जुन क्षत्रिय समाज ट्रस्ट, पुणे यांच्या दि. ३१ मार्च २००५ रोजी संपणाऱ्या मुदतीची हिशोब तपासणी पूर्ण केली आहे. आम्ही सोबतच्या त्या दिवसाचा ताळेबंद व त्यादिवशी संपणारे आय-व्यय पत्रके तपासली असून, आमचा अहवाल पुढीलप्रमाणे आहे :-

१. हिशोब तपासणीसाठी आवश्यक असलेली माहिती व खुलासे आम्हाला मिळाले आहेत.

२. आम्ही केलेल्या हिशोब तपासणीवरुन आम्हांस असे आढळून आले आहे की, मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था संस्थांचा १९५० कायदा व त्या खालील नियम संस्थेचे पोटनियम यांना अनुसरून योग्य ती हिशोबाची पुस्तके ठेवली आहेत.

३. या अहवालात उल्लेखलेले ताळेबंद व आय-व्यय पत्रके हिशोबी पुस्तकाशी जुळतात.

४. आमचे माहितीप्रमाणे व मिळालेल्या खुलाशाप्रमाणे संस्थेच्या पुस्तकाप्रमाणे व आमच्या वेगळ्या त्या दिनांकाच्या अहवालास पात्र राहून सोबतचा ताळेबंद दि. ३१ मार्च २००५ ची खरी वास्तव स्थिती, आय-व्यय पत्रक हे त्या दिवशी संपणाऱ्या मुदतीचा खरा व वास्तव नफा-तोटा दर्शवित आहे.

स्थळ : पुणे.
दिनांक : १२ जुलै २००५

एन. बी. शहा ॲण्ड कं.
- सही -
चार्टर्ड अकौंटंटस्

## ✿ निवेदन व सूचना ✿

१) ज्या समाजबांधवांचे पत्ते बदलले असतील त्यांनी संस्थेच्या कार्यालयात जाऊन अथवा फोन-पत्राद्वारे संस्थेच्या लेखनिकाला बदललेला पत्ता कळवावा.

२) अजूनही ज्यांनी सभासद नोंदणी केली नसेल त्यांनी संस्थेच्या कार्यालयात येऊन सभासद नोंदणीचा फॉर्म भरून नोंदणी करावी. यासाठी सदरील व्यक्ती पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत अथवा पुणे शहर परीसरात वास्तव्यास असली पाहिजे. वास्तव्याच्या काळाचे बंधन नाही. मात्र ३१ ऑक्टो. २००५ पर्यंत वयाची १८ वर्षे पूर्ण असणे आवश्यक आहे. सभासद नोंदणीसाठी कसलेही शुल्क नाही.

३) पुण्यातील सर्वच दूरध्वनी क्रमांक आत्तापर्यंत ४-५ वेळा बदलले आहेत. संस्थेकडे समाजबांधवांचे नवीन दूरध्वी क्रमांक उपलब्ध नाहीत. तेव्हा सर्व समाजबांधवांना विनंती की त्यांनी आपली नावे व बदललेले दूरध्वनी क्रमांक याची नोंद संस्थेच्या कार्यालयात प्रत्यक्ष किंवा पत्र लिहून अथवा फोनद्वारे करावी.

४) वधूवर सूचक मंडळाची तक्रार आहे की समाजबांधव फक्त मुलींचीच नोंद करतात. मुलांची नोंद करीत नाहीत. आपल्या अपेक्षांसह जास्तीत जास्त तरुणांची नोंदणी होणे आवश्यक आहे. वधु-वर मेळाव्यात जास्तीत जास्त इच्छुक वधु-वरांनी सहभागी व्हावे.

५) समाजातील जास्तीत जास्त युवकांनी युवक संघटनेच्या कार्यात सक्रीय सहभागी व्हावे. तसेच समाजातील महिलांनीही महिला मंडळाच्या कार्यात सक्रीय सहभाग घेऊन सामाजिक कार्यात आपले योगदान द्यावे, ही विनंती.

# श्रद्धांजली



आपल्या समाजाचे माजी अध्यक्ष डॉ. प्रकाश भुजंगसा त्रिमल यांचे दि. २७ एप्रिल २००५ रोजी दुःखद निधन झाले. त्यांनी समाजासाठी केलेल्या कार्यामुळे ते केवळ पुणे ग्रामसभेलाच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्र समाजाला परिचित होते. त्यांच्या अवेळी जाण्यामुळे आपल्या समाजाचे अपरिमित नुकसान झाले आहे. त्यांनी पाहिलेली समाजविकासाची स्वप्ने साकार करणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल !

कै. डॉ. प्रकाश त्रिमल यांचे सहकारी (माजी ट्रस्टी) व जुने कार्यकर्ते

**श्री. शंकरसा रेवणसा दाणी**

यांचे दुःखद निधन झाले आहे. त्यांच्या जाण्यानेही समाजाचे न भरुन येणारे नुकसान झाले आहे.

गेल्या अहवालवर्षात समाजातील काही बंधु आणि भगिनींचे अल्पशा आजाराने अथवा वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. समाजाच्या अस्तित्वामध्ये व प्रगतीमध्ये प्रत्येक समाजबांधवाचा अमूल्य वाटा असतो. त्यामुळे अशा व्यक्तींच्या निधनाने केवळ त्यांच्या कुटुंबियांच्याच नव्हे तर समाजाच्या दुःखाला पारावार रहात नाही. परंतु ईश्वरी इच्छेपुढे मनुष्य हतबल होतो.

सर्व दिवंगत समाजबांधवांची नावे येथे छापता येणे शक्य नसले तरी सर्वच ज्ञात व अज्ञात दिवंगत समाजबांधवांना कार्यकारिणी व समाजबांधवांचे वतीने

**भावपूर्ण विनम्र श्रद्धांजली.**

कार्यकारी मंडळ,
श्री सो. स. क्षत्रिय समाज (ट्रस्ट), पुणे



श्री राजराजेश्वर सहस्त्रार्जुन जयंती प्रसंगी मिरवणूक प्रस्थान करताना उपस्थित समाजबांधव



श्री राजराजेश्वर सहस्त्रार्जुन जयंती मिरवणूक प्रसंगी उपस्थित समाजबांधव

☎ : २४४७२३४०
२४४३५६९५

# श्री सोमवंशीय सहस्रार्जुन क्षत्रिय समाज (ट्रस्ट) पुणे

प्रमुख कार्यालय : ५७६, गुरुवार पेठ, पुणे - ४११ ०४२.
उपकार्यालय : ४९७, ४९८, ५००, घोरपडे पेठ, पुणे - ४११ ०४२.

बुक-पोस्ट

प्रति, ____________________

____________________

____________________

|   |   |   |   |   |   |
|---|---|---|---|---|---|

मुद्रक :
श्री साई प्रिंटर्स
११०, म. फुले पेठ, संपदा कॉम्पलेक्स,
पुणे - ४११ ०४२.

प्रेषक :
गजानन अर्जुनसा शालगर
अध्यक्ष,
श्री सो. स. क्षत्रिय समाज (ट्रस्ट) पुणे
'क्षत्रिय भवन', ५७६, गुरुवार पेठ,
पुणे - ४११ ०४२.